ePaper
उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली आज राज्यव्यापी जनआक्रोश आंदोलन

वर्ष - 8 । अंक - 363 | UDYAM-MH-26-0158827




# महाईन्यूज ™


**आतील पानांत**

- रोहित बनला कोट्यवधींची कार मालक!
- सिराजबाबत खबरदारी गरजेची!
- TRP चा उच्चांक, सगळे रेकॉर्ड मोडले!
- शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड नाही!


www.mahaenews.com | सोमवार, दि. 11 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महानगरपालिका निवडणूक** भाजपचा ‘फुलप्रूफ प्लान’ आणि अजित पवारांच्या गोटावर लक्ष केंद्रित

# भाजपच्या खेळीने पुण्यात अजित पवारांची डोकेदुखी?

**आपल्या राजकीय सोयीसाठी प्रभागांची तोडफोड करून नकाशा तयार केल्याची चर्चा**

## महानगरपालिकेतील प्रभाग रचनेचं काम अंतिम टप्प्यात; प्रत्यक्ष सूत्रे मात्र भाजपच्या नेत्यांच्या हाती

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर आल्या असताना, पुणे महानगरपालिकेतील प्रभाग रचनेचं काम अंतिम टप्प्यात पोहोचलं आहे. प्रशासनाकडून हे काम सुरू असलं तरी, प्रत्यक्ष सूत्रे मात्र भाजपच्या नेत्यांच्या हाती असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीने केला आहे. भाजपने आपल्या राजकीय सोयीसाठी प्रभागांची तोडफोड करून नकाशा तयार केल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात जोर धरत आहे.**




भाजपसमोर या निवडणुकीत महाविकास आघाडी असली, तरी खरा डोकेदुखीचा मुद्दा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा असल्याचं स्पष्ट होत आहे. माजी नगरसेवकांच्या ताकदीचा विचार केला, तर पुण्यात भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकावर अजित पवार गटाची राष्ट्रवादी आहे. शिवसेनेतील फूट आणि संघटनातील कमजोरीमुळे तिची ताकद पुण्यात लक्षणीयरीत्या घटली आहे. काँग्रेसलाही गटबाजी आणि संघटनात्मक कमकुवतपणाचा सामना करावा लागत आहे, तर मनसेचा प्रभाव २०१२ नंतर कमी झालाय. अशा परिस्थितीत भाजपसाठी सर्वात मोठं आव्हान राष्ट्रवादी असल्याचं समीकरण उभं राहिलं आहे.

राजकीय सूत्रांच्या मते, भाजप यावेळी कोणत्याही पक्षाशी युती करण्याच्या मनःस्थितीत नाही. स्वबळावर लढताना राष्ट्रवादीला कमकुवत करण्यासाठी प्रभाग रचनेत रणनीती आखण्यात आल्याची चर्चा आहे. विशेषतः अजित पवारांचा प्रभाव असलेल्या वडगावशेरी, हडपसर आणि खडकवासला विधानसभा क्षेत्रातील शहरी भागात मोठे प्रभाग तयार करून राष्ट्रवादीचे नगरसेवक कमी करण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप होत आहे.

या घडामोडींवरून सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांचा रोष वाढला आहे. प्रभाग रचनेच्या महत्त्वाच्या चर्चेतून भाजपने जाणीवपूर्वक त्यांना दूर ठेवल्याचा आरोप स्थानिक नेत्यांकडून केला जात आहे. शिवसेनेने संताप व्यक्त करत थेट मुंबईत मोर्चा वळवला आणि उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार पोहोचवली. त्यानंतर राष्ट्रवादीनेही उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे धाव घेतली.

सध्या प्रभाग रचनेचा विषय एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याकडे गेला असून, यामुळे राज्य पातळीवर मोठा राजकीय संघर्ष उभा राहण्याची चिन्हं आहेत. स्थानिक पातळीवर एकत्र न येऊ शकलेले महाविकास आघाडीचे नेते, आता मुंबईत वरिष्ठ पातळीवरून मोठा राजकीय खेळ खेळण्याच्या तयारीत आहेत. पुण्यात मात्र, भाजपने अजित पवारांना गाठण्यासाठी आखलेला हा ‘फुलप्रूफ प्लान’ सध्या राजकीय चर्चेचा हॉट टॉपिक ठरत आहे.

## पुणे महापालिका निवडणूक आणि भाजपची रणनीती

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही महिन्यांवर.
पुणे महापालिकेतील प्रभाग रचना अंतिम टप्प्यात.
प्रशासनाकडून काम सुरू असलं तरी सूत्रे भाजप नेत्यांच्या हातात असल्याचा आरोप.

**महत्त्वाचा मुद्दा:**
भाजपवर प्रभागांची तोडफोड करून राजकीय सोयीचा नकाशा तयार केल्याचा आरोप.
महाविकास आघाडीचे मुख्य लक्ष — भाजपची रणनीती रोखणे.

**भाजपसमोरील खरे आव्हान:**
अजित पवार गटाची राष्ट्रवादी — भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकावर.
शिवसेनेची ताकद फूटीनंतर कमी, काँग्रेसला गटबाजीचा फटका.
मनसेचा प्रभाव २०१२ नंतर घटला.

**रणनीतीचा फोकस:**
यावेळी कोणतीही युती नाही — स्वबळावर लढण्याचा भाजपचा निर्णय.
राष्ट्रवादीचा प्रभाव असलेल्या भागात (वडगावशेरी, हडपसर, खडकवासला) मोठे प्रभाग तयार करण्याचा डाव.
नगरसेवकांची संख्या कमी करण्याची शक्यता.

**सत्तेतील नाराजी:**
शिवसेना आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांचा रोष.
प्रभाग रचनेच्या महत्त्वाच्या चर्चेतून दूर ठेवल्याचा आरोप.
शिवसेनेचा मोर्चा मुंबईकडे — एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार.
राष्ट्रवादीने अजित पवारांकडे धाव घेतली.
प्रभाग रचना आता नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोर्टात.
राज्य पातळीवर मोठा राजकीय संघर्ष होण्याची चिन्हं.

साक्षरता धोरण

## व्यवहार न कळणाऱ्यांचीच संख्या अधिक असल्याचे समोर

# 27 टक्के भारतीयच आर्थिक साक्षर!

## ८५ टक्के नागरिकांकडे बँक खाती

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही वर्षात डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली असून, देशाच्या कानाकोपऱ्यात वित्तीय व्यवहार पोहोचले आहेत. मात्र, देशातील आर्थिक साक्षरांची संख्या केवळ २७ टक्के आहे. याचवेळी ८५ टक्के जनतेकडे बँक खाते असले तरी त्यांचा वापर पूर्णपणे होत नसल्याची बाब व्हीपी रिसर्च संस्थेच्या संशोधन अहवालातून समोर आली आहे.**



व्हीपी रिसर्च संस्थेने 'भारतासाठी राष्ट्रीय आर्थिक साक्षरता धोरण : २०२५' पुढे हा अहवाल जाहीर केला आहे. यात भारताच्या आर्थिक साक्षरतेच्या आजच्या स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. याचबरोबर आर्थिक साक्षरतेचे नव्याने पुनर्रचना करण्याची गरज अधोरेखित केली आहे. अहवालानुसार, देशात तळागाळापर्यंत आर्थिक सेवा पोहोचल्या असल्या तरी त्या योग्य पद्धतीने वापरण्याची क्षमता अजूनही कमी आहे.या अहवालानुसार, देशात फक्त २७ टक्के नागरिक आर्थिकदृष्ट्या साक्षर आहेत. देशभरात बँक खाती ८५ टक्के नागरिकांकडे असून, त्यांचा वापर मर्यादित व अपूर्ण आहे. याचबरोबर महिलांकडे बँक खाती असली तरी त्यांच्याकडे निर्णयक्षमतेची कमतरता आहे. देशातील काही राज्यांत जास्त कर्जबाजारीपणा असूनही, कर्जाचे व्यवस्थापन करण्याचे ज्ञान कमी आहे. देशभरात २०१८ ते २०२३ या कालावधीत डिजिटल व्यवहार ४० पट वाढले. परंतु, डिजिटल फसवणूक किंवा वित्तीय सायबर सुरक्षा याबाबत जनजागृतीचे प्रमाण अतिशय कमी आहे. आर्थिक साक्षरता म्हणजे केवळ बँक खाते काय असते, हे समजणे नाही तर युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) व्यवहार सुरक्षित ठेवणे, कर्जाची जबाबदारीने हाताळणी करणे, विमा योजना समजून घेणे आणि सेवानिवृत्ती योजनांचा योग्य लाभ घेणे गरजेचे आहे, या बाबींवर अहवालात भर देण्यात आला आहे. हा अहवाल चार राष्ट्रीय विदासंचांवर आधारित आहे. त्यात राष्ट्रीय आर्थिक साक्षरता आणि समावेशन सर्वेक्षण २०१९, अखिल भारतीय कर्ज आणि गुंतवणूक सर्वेक्षण २०१९, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ व ५, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा वित्तीय प्रवेश सर्वेक्षण २०१८-२०२३ यांचा समावेश आहे. याचबरोबर केंद्र सरकारच्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांचे विश्लेषण, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील चांगल्या उदाहरणांवर आधारित शिफारसी या अहवालात सादर केल्या आहेत. नवे आर्थिक साक्षरता धोरण तयार करणे.महिला, शेतकरी, गिग कामगार, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी यांच्यासाठी साक्षरता आराखडा करणे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आर्थिक साक्षरता समाविष्ट करणे.

राज्य आणि जिल्हा स्तरावर वित्तीय साक्षरता निर्देशांक तयार करणे.वित्ततंत्रज्ञान कंपन्या, स्वयंसेवी आणि देशातील विद्यापीठांचे आर्थिक साक्षरतेसाठी सहकार्य घेणे.भारतामध्ये सध्या ९६ कोटींहून अधिक बँक खाती, ८५ कोटी डेबिट कार्ड, आणि दरवर्षी ८० हजार कोटींहून अधिक डिजिटल व्यवहार होतात. आर्थिक सेवांचा वापर लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, वित्तीय माहितीच्या अभावामुळे नुकसान होण्याची शक्यता वाढत आहे. म्हणूनच, आर्थिक साक्षरतेच्या नव्या टप्प्याकडे वळण्याची हीच वेळ आहे.व्हीपी रिसर्च संस्थेने 'भारतासाठी राष्ट्रीय आर्थिक साक्षरता धोरण : २०२५' पुढे हा अहवाल जाहीर केला आहे. यात भारताच्या आर्थिक साक्षरतेच्या आजच्या स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. याचबरोबर आर्थिक साक्षरतेचे नव्याने पुनर्रचना करण्याची गरज अधोरेखित केली आहे. अहवालानुसार, देशात तळागाळापर्यंत आर्थिक सेवा पोहोचल्या असल्या तरी त्या योग्य पद्धतीने वापरण्याची क्षमता अजूनही कमी आहे.या अहवालानुसार, देशात फक्त २७ टक्के नागरिक आर्थिकदृष्ट्या साक्षर आहेत. देशभरात बँक खाती ८५ टक्के नागरिकांकडे असून, त्यांचा वापर मर्यादित व अपूर्ण आहे.

### सुरक्षा याबाबत जनजागृती

याचबरोबर महिलांकडे बँक खाती असली तरी त्यांच्याकडे निर्णयक्षमतेची कमतरता आहे. देशातील काही राज्यांत जास्त कर्जबाजारीपणा असूनही, कर्जाचे व्यवस्थापन करण्याचे ज्ञान कमी आहे. देशभरात २०१८ ते २०२३ या कालावधीत डिजिटल व्यवहार ४० पट वाढले. परंतु, डिजिटल फसवणूक किंवा वित्तीय सायबर सुरक्षा याबाबत जनजागृतीचे प्रमाण अतिशय कमी आहे.

# पुणे भाजपा मंडल अध्यक्षांचा दिल्लीत 'सशक्त' ठसा!

## मिशन महापालिका : शहा, नड्डा, गडकरी यांच्यासमोर निवडणूक रणनितीचं प्रभावी सादरीकरण

। नवी दिल्ली/ पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील भाजपा मंडल अध्यक्षांनी दिल्लीत थेट केंद्रीय नेतृत्वाच्या उपस्थितीत आगामी महापालिका निवडणुकांसाठी 'रणनिती' सादर करत प्रभावी उपस्थिती लावली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समोर झालेल्या या बैठकीत कार्यकर्त्यांच्या अनुभवातून तयार झालेला 'ग्राउंड रोडमॅप' मांडण्यात आला. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या भेटीचा मुख्य सूत्रधार ठरले आहेत.**



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुणे मंडल अध्यक्षांना उद्देशून स्पष्ट संदेश दिला की, "मतदारयादीतील प्रत्येक पानावर असलेला कार्यकर्ता म्हणजे भाजपाची मूलभूत ताकद आहे." त्यांनी या बैठकीत 'पन्ना प्रमुख' रचनेवर भर देत थेट संवाद साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले."विजय ही केवळ रणनीती नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या अथक श्रमांची फलश्रुती आहे," अशा शब्दांत अमित शहा यांनी कौतूक केले आहे. पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांचे तंत्रशुद्ध मार्गदर्शन केले. आकडेवारी आणि पारदर्शक संघटना हीच खरी ताकद आहे. भाजपाचे यश गेली अनेक वर्षे निवडणुकीच्या सतत चालू असलेल्या "इलेक्शन मोड"मध्ये आहे. "आम्ही हार-जीत न पाहता आकडेवारी, फीडबॅक आणि कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित रणनिती आखतो," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, मतदारयादीतील प्रत्येक पानावर (पन्ना) नियुक्त असलेल्या कार्यकर्त्यांशी थेट संपर्कात राहा, अशी सूचना दिली.

### संवाद आणि कार्यकर्ता सन्मान...

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुणे मंडल अध्यक्षांचे स्वागत करत भाजपाची संघटनशक्ती आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचा आवाज याचे विशेष कौतुक केले. "मोठा नेता आणि गल्लीतील कार्यकर्ता दोघांनाही सारखे महत्त्व देणारा पक्ष म्हणजे भाजप," असा सल्ला त्यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिला.

### मुरलीधर मोहोळ यांची भूमिका ठळक...

या दौऱ्याच्या आयोजनामागे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची भूमिका ठळक होती. केवळ भेटच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरून पुणे भाजपाच्या संघटनेवर असलेला विश्वास आणि 'गल्लीतून संसद' पर्यंतचा संवाद' याचे प्रतिबिंब या बैठकीतून स्पष्ट दिसले. "महापालिका निवडणुका जवळ असल्याने यंत्रणा सज्ज ठेवणे आणि थेट संवादातून दिशा मिळवणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे, अशी भावना मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केली.

## पंतप्रधान आवास योजना साडेसहा हजार कुटुंबांना मिळणार घर

# पिंपरी चिंचवडमध्ये सर्वसामान्यांना मिळणार हक्काचे घर!

### आणखी नऊ ठिकाणी पंतप्रधान आवास योजना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात आणखी नऊ ठिकाणी पंतप्रधान आवास योजना राबविली जाणार आहे. त्यात साडेसहा हजार सदनिका बांधण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील तब्बल साडेसहा हजार कुटुंबांना पक्के व हक्काची घरे मिळणार आहेत..**




महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत मोशीतील बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, पिंपरीतील उद्यमनगर, आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारला आहे. तेथे एकूण 3 हजार 668 सदनिका आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना देण्यात आल्या आहेत. तर, डुडुळगाव येथील 1 हजार 190 सदनिकेचा गृहप्रकल्पांच्या इमारत बांधकाम सुरू आहे. न्यायालयात वाद गेल्याने जागा ताब्यात न आल्याने रावेत येथील 934 सदनिकांचा गृहप्रकल्प रद्द करण्यात आला आहे. तेथील लाभार्थ्यांना किवळे येथे सदनिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

रावेत येथील रद्द झालेला गृहप्रकल्प पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच, मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी, ताथवडे, रावेत आणि चोविसावाडी असे एकूण नऊ ठिकाणी महापालिकेच्या वतीने दुसऱ्या टप्प्यात ही योजना राबविण्यात येत आहे. महापालिकेने सुधारित विकास योजना आराखड्यात (डीपी प्लॅन) या आठ ठिकाणच्या जागा आरक्षित केल्या आहेत. त्यापैकी मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी व रावेत या सहा ठिकाणी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सदनिका असणार आहेत. तर, उर्वरित रावेत, ताथवडे, चोविसावाडी या ती ठिकाणी एचडीएच गटासाठी (बेघरासाठी घरे) गृहप्रकल्प आहे. रावेत येथे जुन्या तसेच, नवा असे दोन गृहप्रकल्प होणार आहेत.

या नऊ गृहप्रकल्पांत साडेसहा हजार सदनिका उभारल्या जाणार आहेत. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील कुटुंबांना आपल्या सोईस्कर ठिकाणी परवडणाऱ्या दरात सदनिका घेता येणार आहेत. त्यासाठी आणखी किमान तीन ते पाच वर्षे प्रतिक्षा करावी लागणार आहे. तसेच, शहरात म्हाडासाठी आणखी काही ठिकाणी जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे परवडणाऱ्या दरातील आणखी गृहप्रकल्प शहरात तयार होतील, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

### दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या पंतप्रधान आवास योजना

ठिकाण-प्रयोजन-क्षेत्र (हेक्टरमध्ये)
मामुर्डी-ईडब्ल्यूएस-1.44
पुनावळे-ईडब्ल्यूएस-2.00
वाकड-ईडब्ल्यूएस-2.00
दिघी-ईडब्ल्यूएस-1.14
वडमुखवाडी-ईडब्ल्यूएस-2.00
रावेत-ईडब्ल्यूएस-2.00
रावेत-एचडीएच-2.00
ताथवडे-एचडीएच-4.10
चोविसावाडी-एचडीएच-3.59

# डीपी प्लान वरील हरकतींच्या सुनावणीकडे लक्ष!

## 50 हजार हरकतींवर लवकरच सुनावणी

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रारूप सुधारित विकास योजना आराखडा (डीपी प्लॅन) प्रसिद्ध करून त्यावर 60 दिवस हरकती व सूचना स्वीकारल्या. त्यावर शहरवासीयांकडून तब्बल 50 हजार हरकती दाखल करण्यात झाल्या आहेत. त्यावर सुनावणीसाठी प्राधिकृत समितीची स्थापना करण्यात आली आहे. लवकरच सुनावणी घेतली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**



महापालिकेने डीपी आराखडा 16 मे रोजी प्रसिद्ध केला. त्यावर 14 जुलैपर्यंत एकूण 60 दिवसांच्या मुदतीमध्ये हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. डीपीत असंख्य चुका झाल्या आहेत. गरज नसताना अनेक ठिकाणी विविध सेवा व सुविधांची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. आरक्षण असलेले भागांत पुन्हा तीच आरक्षणे नव्याने टाकण्यात आली आहेत. त्यामुळे शहरभरातून विक्रमी 50 हजार हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच, डीपीविरोधात मोर्चा, धरणे, उपोषण अशी आंदोलनही करण्यात आली. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही डीपी अन्यायकारक असून, तो रद्दची मागणी सत्ताधारी आमदारांकडून करण्यात आली.

हरकती स्वीकारण्याची मुदत संपून, 20 दिवस झाले तरी, अद्याप सुनावणी सुरू करण्यात आली नाही. राज्य शासनाने सुनावणीसाठी प्राधिकृत समितीची स्थापना केली आहे. ती समिती लवकरच सुनावणीचे वेळापत्रक जाहीर करणार आहे. त्यानुसार विभागनिहाय सुनावणी घेतली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### सुनावणी प्रक्रिया लवकरच

हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी राज्य शासनाने समिती नेमली आहे. ती समिती सुनावणीचे वेळापत्रक लवकरच जाहीर करणार आहे. त्यानुसार सुनावणी प्रक्रिया सुरू केली जाईल, असे महापालिकेच्या नगर रचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले यांनी सांगितले.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



श्रीब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

### अनुसंधानीं चित्त। सर्वांभूतीं भगवंत। हाच माझा परमार्थ॥

ज्यास पाहिजे असेल हित । त्याने ऐकावी माझी मात ॥ जो झाला रामभक्त । तेथेंच माझा जीव गुंतत ॥ मला रामभक्तावीण कांहीं । सत्य सत्य जगीं कोणी नाहीं ॥ जीवाचें व्हावें हित । हाच मनाचा संकल्प देख ॥

तुम्हांस सांगावें कांहीं । ऐसें सत्य माझेजवळ नाहीं ॥ पण एक सांगावें वाटतें चित्ती । रघुपतीवीण शोभा नाहीं जगतीं ॥ मुलगी सासरीं गेली । तिची काळजी सासरच्यांला लागली । तैसें तुम्ही माझे झालां । आतां काळजी सोंपवावी मला ॥

सदा राखा समाधान । हाच माझा आशीर्वाद पूर्ण ॥ मी तुमची वेळ साधली । हा ठेवा मनीं विश्वास । आनंदानें राहावें जगांत ॥ अंतकाळची काळजी । तुम्ही कशाला करावी?॥ व्यवहार मी सांभाळला । तरी पण रामाला नाहीं दूर केला ॥

राम सखा झाला । नामीं धन्य मला केला ॥ मीं तुम्हांस म्हटलें आपलें । याचें सार्थक करून घेणें आहे भलें । नामापरतें न माना सुख । हाच माझा आशीर्वाद ॥ माना माझे बोल सत्य । कृपा करील खास भगवंत ॥

मीलय असो कोठें तरी । मी तुम्हांपासून नाहीं दूर । याला साक्ष रघुवीर ॥ तुमचे आनंदांत माझें अस्तित्व जाण । दु:खी होऊन न करावें अप्रमाण ॥ तुम्ही माझे म्हणवितां । मग दु:खी-कष्टी कां होता ॥

उपाधिवेगळे झालां । ऐसे ऐकूं द्यावें मला ॥ माझें ज्यानें व्हावें। त्यानें राम जोडून घ्यावें ॥ दृश्य वस्तूचा होतो नाश । याला मीहि अपवाद नाहीं खास ॥ शेवटीं मागणें तुम्हां एकच पाहीं । नामावांचून दूर कधीं न राहीं ॥

अनुसंधानीं चित्त । सर्वांभूतीं भगवंत । नामीं प्रेम फार । त्याला राम नाहीं दूर ॥ मी सांगितल्याप्रमाणें वागावें । राम कृपा करील हें निश्चित समजावें ॥ आतां आनंदानें द्यावा निरोप। हेंच तुम्हां सर्वांस माझें सांगणें देख ॥

सदा राहावें समाधानीं । नको सुखदु:ख काळजीचा लेश । माझा झाला जगदीश । हा भाव ठेवा निरंतर । राम साक्षी, मी तुम्हांपासून नाहीं दूर ॥ सर्वांचें करावें समाधान । जें माझे प्राणाहून प्राण जाण ॥ सर्वांनी व्हावें रामाचें । हाच माझा आशीर्वाद घेई साचें ॥ जगाचें ओळखावें अंत:करण । तैसें आपण वागावें जाण ॥ नामापरतें दुजें न मानावें । एका प्रभूस शरण जावें ॥ हा करावा उपाय । तोच समाधानाला नेईल खास ॥ विवेक-वैराग्य संपन्न । सदा असो अंत:करण ॥

अखंड घडो भगवद्भक्ति । आत्मज्ञानप्रतीति । ब्रह्मस्वरूपस्थिति । नामीं निरंतर जडो वृत्ति ॥ मी आहे तुमच्यापाशी हा ठेवावा निर्धार । न सोडावा आता धीर ॥ सुखानें करा नामस्मरण । कृपा करील रघुनंदन ॥

बोधवचन:- काया गुंतवावी प्रपंचात। मन असावे रघुनाथात॥




**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक


# दो बेचारे, बिना सहारे.. देखो, फूट फूट कर रोये !

**काही वर्षांपूर्वी 'व्हिक्टोरिया नंबर 203' असा एक चित्रपट आला होता. अशोककुमार आणि प्राण अशा दिग्गज कलाकारांनी धमाल आणली होती. त्यांना एक किल्ली सापडते आणि त्या किल्लीचे कुलूप शोधत असतात. या चित्रपटाची आठवण आत्ताच होण्याचे कारण म्हणजे राहुल गांधी आणि शरद पवार ! कपोलकल्पित बाता मारून निवडणूक आयोगावर शंका घेत आहेत. पण, पुरावे देत नाहीत, ही शोकांतिका आहे.**



### पारदर्शकतेवरच अविश्वास !

निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवरच राहुल गांधी हे अविश्वास दाखवत असताना आयोगाने सांगितलेल्या किंवा मागितलेल्या गोष्टींकडे मात्र दुर्लक्ष करत आहेत. कोणताही पुरावा नाही, कसलीही कागदपत्रे हातात नाहीत आणि आरोप मात्र सुरू आहेत. हा आयोग विश्वासार्ह नाही, हे सिद्ध करण्यासाठी त्यांच्या हाकेला 'ओ' देत शरद पवार यांनी देखील एक पुडी सोडली आहे. निवडणुकीपूर्वी आपल्याला दोन माणसे भेटली होती आणि आपल्या पक्षाचा १६० जागांवर विजय निश्चित करून देतो, असे म्हणत त्यांनी संजय राऊत स्टाईल फेकाफेकी केली आहे.

### शरद पवारांचे अर्धसत्य..

यामुळे दोन-तीन गोष्टींचा उलगडा होत नाही. ती माणसे कोण होती, त्यांना राहुल गांधी यांच्या घरी नेऊन सोडले तेथेही नोंद नव्हती का ? या प्रश्नांची शरद पवारांकडे उत्तरे नाहीत. एका कार्यक्रमात पन्नास वर्षांपूर्वी भेटलेल्या मित्राला हे ओळखतात, पण सात-आठ महिन्यापूर्वीची माणसे मात्र लक्षात राहत नाहीत, हा विनोद नाही का ? अर्थात, राहुल गांधी आणि शरद पवार या दोन बिचाऱ्यांची अवस्था, किल्ली आहे, पण कुलूप सापडत नाही अशी झाली असावी. त्यामुळेच खोटे बोल पण रेटून बोल, फेक नॅरेटिव्ह चा आधार घे, अशी झाली आहे.

### पोलिसांकडे का नेले नाही?

संपूर्ण देशामध्ये राजकारणात मुरलेले सर्वात बुजूर्ग नेते म्हणजे शरद पवार ! निवडणुका फिरवण्याच्या इराद्याने त्यांच्याकडे आलेल्या त्या खोटारड्या माणसांना त्यांनी थेट सुनावले का नाही, आणि पोलिसांकडे का सोपवले नाही हा पहिला प्रश्न. त्यांना राहुल गांधी यांच्याकडे नेऊन निवडणुका पदरात पाडून घेण्याची चाल तर त्यांना रचायची नव्हती ना, हा दुसरा मुद्दा आणि गेले सुमारे वर्षभर ते गप्प का बसले हा तिसरा मुद्दा ! मुख्य म्हणजे शरद पवारांचे शंभर उमेदवार सुद्धा उभे नव्हते, १६० कसे जिंकणार होते? खरेच खोटारडेपणाची हद्द झाली. शरद पवार आणि राहुल गांधी यांना मीडियात डिमांड आल्यामुळे उद्धव ठाकरे मागे कसे राहिले असे म्हणत संजय राऊत यांनी देखील यामध्ये नाक खुपसले आणि ही दोन माणसे आम्हाला पण भेटण्याचे सांगून टाकले. शरद पवारांचे तीन खोटे मुद्दे अर्थातच संजय राऊत यांनाही लागू होतात. सगळी लबाडाची चाल..एक जरी पुरावा दिला तरी संपूर्ण देश विश्वास ठेवेल आणि निवडणूक आयोग तोंडावर पडेल ! पण हवेत गोळीबार करण्यात एक्सपर्ट असणारी ही मंडळी आपली सुसाट सुटली आहेत !

### नेमके काय म्हणाले शरद पवार?

विधानसभा निवडणुकीआधी मला दिल्लीत दोन माणसे भेटली होती. त्यांनी मला १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती, असा गौप्यस्फोट शरद पवार यांनी केला होता. आता या गौप्यस्फोटानंतर संजय राऊत यांनी एक मोठा दावा केला आहे. शरद पवारांना भेटलेली ती माणसे उद्धव ठाकरेंनाही भेटली होती, त्यांनी आम्हाला ६० ते ६५ कठीण जागा जिंकून देण्याचा दावा केला होता, असा मोठा खुलासा संजय राऊतांनी केला आहे.

### संजय राऊत यांची फेकाफेकी ?

शरद पवार यांनी जो विषय मांडला की निवडणुकीपूर्वी त्यांना काही लोक भेटले आणि १६० जागा मिळवून देतो, विशिष्ट रक्कम द्या अशी मागणी केली. यापैकी काही लोक उद्धव ठाकरेंनाही भेटले होते. आम्ही त्यांना सांगितले की आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. देशातले वातावरण पाहता लोकसभा आम्ही १०० टक्के जिंकू आणि खरोखर महाराष्ट्रात आम्ही ते यश प्राप्त केले. त्यामुळे निवडणुकीत अशा प्रकारे घोटाळे करून आम्हाला जिंकायची गरज नाही, असे म्हणे संजय राऊत म्हणाले. दररोज, सकाळी वर्षानुवर्षे टीव्ही समोर येणाऱ्या संजय राऊत यांना संपूर्ण वर्षात हा मुद्दा मांडायला सुचले नव्हते का? शरद पवार बोलत आहेत ना, मग त्याला दुजोरा द्या, एवढेच यात तथ्य असावे असे वाटते, बाकी नेहमीप्रमाणे नुसती फेकाफेकी !

### 'त्या' लोकांचे म्हणणे काय ?

संजय राऊत पुढे काय सांगतात ते पाहू. म्हणे, विधानसभा निवडणुकीपूर्वी ते लोक परत आले. आम्ही त्यांना सांगितले की लोकसभेत आमचा विजय झाला आहे. विधानसभेत आम्ही नक्की जिंकू. ते लोक म्हणाले की तुमच्या ज्या ६० ते ६५ जागा कठीण वाटत आहेत, त्या सांगा. आम्ही तुम्हाला त्या 'ईव्हीएम' च्या माध्यमातून विजयी करून देऊ. आम्ही त्यांना सांगितले की आम्हाला त्याची गरज वाटत नाही. पण त्यांनी इतकेही सांगितले की तुम्हाला जरी हे आवश्यक वाटत नाही, तरी समोर जे सरकारमध्ये आहे, त्यांनी अशा प्रकारची योजना 'ईव्हीएम' च्या माध्यमातून आणि मतदार याद्यांच्या माध्यमातून जे काम केले आहे, त्यामुळे तुमचे अपयश आम्हाला दिसत आहे, त्यामुळे आम्ही तुम्हाला मदत करू शकतो. तरी आमचा विश्वास निवडणूक यंत्रणेवर, निवडणूक आयोगावर आणि लोकशाहीवर होता. दुर्दैवाने जे शरद पवार म्हणत आहेत आणि उद्धव ठाकरेंना जी माणसे भेटली त्यांच्या बोलण्यात तथ्य असावे,असे संजय राऊत म्हणाले.

### अपयश आले की आरोप..

महाविकास आघाडीला म्हणजे शरद पवार गट उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेस यांना आरोप आणि टीका टिप्पणी याशिवाय काहीही उद्योग नाही. त्यांना कोणतेही काम करायचे नाही किंवा जनतेमध्ये जायचे नाही. सत्ताधारी करत असलेल्या कामाचा कोळंबा करणे आणि टीका करून त्यांना बदनाम करणे, हा या तिघांचा एक कलमी कार्यक्रम सुरू आहे. सत्ताधाऱ्यांच्याकडून होत असलेली सकारात्मक कामे त्यांना दिसत नाहीत, त्याची दखल घेणे सोडा त्याला अडथळे कसे निर्माण होतील एवढाच यांना धंदा आहे आणि हे सर्व देशातील जनता पाहत आहे, त्यामुळे जनतेनेच त्यांना त्याची जागा दाखवली आहे.

### 'इंडिया' आघाडीची बोंब..

भाजपा प्रणित एनडीए आघाडीच्या विरोधात लढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' आघाडीची स्थापना झाली. अपेक्षेप्रमाणे सर्वत्र अपयश आले. पण, त्यानंतर आघाडीच्या बैठका घेणे, एखादा कार्यक्रम हाती घेऊन देश ढवळून काढणे किंवा जनतेपुढे सकारात्मक भूमिका घेऊन जाणे, हे या 'इंडिया' आघाडीला मान्य नसावे. एक संघ नसलेली ही आघाडी विस्कटल्याप्रमाणे कार्यक्रम राबवत आहे. याउलट एनडीए आघाडी एकसंधपणे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाच्या पाठीमागे भक्कम उभी आहे, हेच चित्र देशात असून ते राहुल गांधी यांना मान्य नाही.

### राहुल गांधी कसे जिंकणार?

विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीचे नेते राहुल गांधी म्हणजे अभ्यासशून्य आणि कर्तृत्वशून्य नेतृत्व असल्याचे सर्व जग जाणून आहे. विजय मिळाला की ईव्हीएम छान, आणि पराभव झालाय की ईव्हीएम घाण असे त्यांचे ब्रीदवाक्य आहे. कर्नाटक सह अन्य ठिकाणी यश मिळाले की तेथे त्यांचा ईव्हीएम वर कधीच अविश्वास नसतो. पण ज्या ठिकाणी धूळधाण उडाली, तेथील मात्र सेट केलेली असतात. अशा या नेतृत्वाला भारतीयांनी झिडकारले आहे आणि आपल्या भूमिकेत सुधारणा केल्याशिवाय ते अंधारातून उजेडात येणार नाहीत. बेछूट, बिनबुडाचे आणि बिनधास्त आरोप करून मीडिया पुढे चमकोगिरी करता येते, पण आरोपात तथ्य नसेल तर हीच जनता तोंडावर पाडते, हे एकदा दोनदा नव्हे, तर वारंवार होत आहे, हे यांच्या नेत्यांच्या लक्षात येत नसेल का?


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

तक्रार

## शिवसेना व काँग्रेस नेत्यांची महसूलमंत्र्यांकडे तक्रार

# चुकीच्या धोरणामुळे शेतकरी अडचणीत!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शासनाच्या चुकीच्या जमीन धोरणांमुळे अनेक शेतकरी अडचणीत आलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करून शेतकऱ्यांना सहाय्यभूत होईल असे जमीन धोरण अंमलात आणावे, अशी मागणी जिल्ह्यातील शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर आणि काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.**

### ४० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते



जालना दौऱ्यात महसूलमंत्री यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी १९५० पासून जमिनीचे ताबेदार आणि मालक असून खासरा पत्रकावर त्यांच्या नोंदी आहेत. परंतु 'सर्व्हे नंबर' तयार करताना चुकीच्या नोंदी होऊन तेथे इनामी जमीन, गायरान इत्यादी नावे लागली. त्याचप्रमाणे 'वर्ग-२' जमीन विक्री करताना शासन ताबाधारकास कृषक वापरासाठी ५० टक्के तर अकृषक वापरासाठी ७५ टक्के मूल्य वसूल करते. ही जमीन हस्तांतर किंवा विक्री करताना पुन्हा मूल्य आकारण्याची पद्धत बंद करावी. भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय भूखंडाचे दरवर्षी नूतनीकरण करण्यासह लहान-सहान कारणांवरून शर्तभंग तसेच उपयोगिता बदलाचे कारण दाखवून प्रशासनाकडून संस्थांना अडचणीत आणले जाते. त्यामुळे असे भूखंड धर्मादाय आयुक्तात नोंदणी केलेल्या सर्व उद्देशासाठी वापरण्याची परवानगी दिली पाहिजे.जालना शहरामधील जवळपास ४० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते. त्यांना मालकी हक्क देण्याची आवश्यकता आहे. जालना महानगरपालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्र, मैदाने इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र शासनाची मालकी दाखविण्यात आलेली आहे.

त्यामुळे विकासकामांत अडचणी येतात. या जागांवर महानगरपालिकेची मालकी कागदोपत्री दाखविली पाहिजे. जालना ते नांदेड दरम्यान समृद्धी जोडण्यासाठी रस्त्याचे भूसंपादन करताना कमी मोबदला देऊन शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे. यासाठी जालना तालुक्यातील शेतकरी मागील साडेतीन महिन्यांपासून देवमूर्ती परिसरात आंदोलन करीत आहेत, याकडे या निवेदनात महसूलमंत्री यांचे लक्ष वेधण्यात आले आहे. जालना दौऱ्यात महसूलमंत्री यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी १९५० पासून जमिनीचे ताबेदार आणि मालक असून खासरा पत्रकावर त्यांच्या नोंदी आहेत. परंतु 'सर्व्हे नंबर' तयार करताना चुकीच्या नोंदी होऊन तेथे इनामी जमीन, गायरान इत्यादी नावे लागली. त्याचप्रमाणे 'वर्ग-२' जमीन विक्री करताना शासन ताबाधारकास कृषक वापरासाठी ५० टक्के तर अकृषक वापरासाठी ७५ टक्के मूल्य वसूल करते. ही जमीन हस्तांतर किंवा विक्री करताना पुन्हा मूल्य आकारण्याची पद्धत बंद करावी. भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय भूखंडाचे दरवर्षी नूतनीकरण करण्यासह लहान-सहान कारणांवरून शर्तभंग तसेच उपयोगिता बदलाचे कारण दाखवून प्रशासनाकडून संस्थांना अडचणीत आणले जाते. त्यामुळे असे भूखंड धर्मादाय आयुक्तात नोंदणी केलेल्या सर्व उद्देशासाठी वापरण्याची परवानगी दिली पाहिजे.जालना शहरामधील जवळपास ४० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते. त्यांना मालकी हक्क देण्याची आवश्यकता आहे. जालना महानगरपालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्र, मैदाने इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र शासनाची मालकी दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे विकासकामांत अडचणी येतात. या जागांवर महानगरपालिकेची मालकी कागदोपत्री दाखविली पाहिजे.जालना ते नांदेड दरम्यान समृद्धी जोडण्यासाठी रस्त्याचे भूसंपादन करताना कमी मोबदला देऊन शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे.

### जमीन धोरण अंमलात आणावे

यासाठी जालना तालुक्यातील शेतकरी मागील साडेतीन महिन्यांपासून देवमूर्ती परिसरात आंदोलन करीत आहेत, याकडे या निवेदनात महसूलमंत्री यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.शासनाच्या चुकीच्या जमीन धोरणांमुळे अनेक शेतकरी अडचणीत आलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करून शेतकऱ्यांना सहाय्यभूत होईल असे जमीन धोरण अंमलात आणावे.

# हगवणे प्रकरणातून धडा घेतला नाही का?

## पैशांसाठी वैष्णवी हगवणे या विवाहितेचा बळी : रोहित पवारांची पोस्ट

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी स्नेहा झोंडगे आत्महत्या प्रकरणात केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. वैष्णवी हगवणेच्या मृत्यूचं प्रकरण ताजं असतानाच पुण्यात आणखी एक घटना समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणातून आपण काहीच धडा घेतला नाही का? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.**





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्नेहा आणि विशाल यांचा विवाह गेल्या वर्षी २ मे २०२४ रोजी झाला होता. विवाहानंतर काही दिवसांतच सासरकडील मंडळींनी कंपनी चालविण्यासाठी माहेरून २० लाख रुपये आणण्याची मागणी केली. पैशांसाठी तिच्यामागे तगादा लावण्यात आला. पैशांसाठी स्नेहाला वारंवार शिवीगाळ, तसेच मारहाण केली होता. तिचा शारिरिक आणि मानसिक छळ केला. छळ असह्य झाल्याने स्नेहाने पतीसह नातेवाईकांविरुद्ध यापूर्वी पोलिसांकडे तक्रार केली होती. मात्र, सासरे संजय झेंडगे यांचा साडू भाऊसाहेब कोल्हाळ याने तिला दमदाटी करून तक्रार मागे घेण्यास भाग पाडले होते. तक्रार मागे घेतल्यानंतरही स्नेहाचा छळ सुरू होता. राखी पौर्णिमेला भावाला बोलाविल्यास त्याला जिवे मारू, अशी धमकी तिला देण्यात आली होती. त्यानंतर तिने हे टोकाचं पाऊल उचललं. आता आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणी पोस्ट केली आहे.पैशांसाठी वैष्णवी हगवणे या विवाहितेचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाच माहेराहून २० लाख रुपये आणण्याच्या सासरच्या मागणीला कंटाळून पुण्यात आंबेगाव इथं स्नेहा विशाल झेंडगे (वय २७) या विवाहितेने आत्महत्या केल्याची अत्यंत दुःखद आणि वेदनादायी घटना घडली.

### नेमकं हे प्रकरण काय?

गुन्हा दाखल झाला असून त्यांना अटकही होईल पण यामुळं स्नेहाचा गेलेला जीव परत येणार आहे का? हा प्रश्न मनाला सतावतो. वैष्णवी हगवणे प्रकरणातून समाजाने कोणताही धडा घेतलेला दिसत नसल्याचंच यातून दिसून येतं. लग्नानंतर अवघ्या दीड वर्षात विवाहितेला जीव गमवावा लागत असेल तर या घटनेला कारणीभूत असलेल्या प्रत्येकाला कठोर शिक्षा झाली पाहिजे.

आरोप प्रकरण

## शकुन राणी डबल व्होटर आरोप प्रकरणी बजावली नोटीस

# राहुल गांधींनी सबळ पुरावे द्यावे!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दोन दिवसांपूर्वी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाने भाजपाशी हात मिळवणी करत निवडणूक मॅनेज केल्याचा आरोप केला होता. अंपायरच भाजपाशी हातमिळवणी करत असेल तर काय करणार? असाही सवाल त्यांनी केला होता.**

## आयोगाने काय म्हटलं आहे?




दरम्यान त्यांनी शकुन राणी यांना निवडणूक आयोगाने कसं डबल व्होटर केलं हे उदाहरणासह स्पष्ट करुन दाखवलं होतं. त्यावरुन आता निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली आहे. एवढंच नाही तर राहुल गांधींचे दावे दिशाभूल करणारे आहेत असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे."नव्या मतदारांनी, तरुण मतदारांनी भाजपाला मतदान केलं असं सांगण्यात आलं. त्यासाठी फॉर्म ६ चा उपयोग करण्यात आला. पण ३३ हजार ६९२ नावांचा दुरुपयोग करण्यात आला. तुम्हाला एक उदाहरण देतो. शकुन राणी नावाची एक महिला आहे ही महिला ७० वर्षांची आहे. तिने दोन वेळा अर्ज क्रमांक ६ भरला. आता हे बघा शकुन राणी असं नाव आहे. या फोटोत याच महिलेचा फोटो झूम करुन लावण्यात आला आहे. दुसऱ्यांदा या महिलेने दोनदा अर्ज केला. दुसऱ्या अर्जावर हे नाव फक्त शकुनराणी नाव आहे. आडनावाचा रकाना रिकामा आहे. या महिलेने दोनदा मतदान केलं किंवा दुसऱ्यांदा तिच्या नावे दुसऱ्या कुणीतरी मतदान केलं." असा आरोप राहुल गांधींनी केला होता. तसंच देशभरात या घटना घडल्याचंही राहुल गांधी म्हणाले होते. आता निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस बजावत उत्तर मागितलं आहे. राहुल गांधींनी ७ ऑगस्टला पत्रकार परिषद घेऊन भारतीय निवडणूक आयोगाने तुम्हाला कागदपत्रं दिली आहेत ती सादर करतो असं म्हटलं होतं. त्यात तुम्ही शकुन राणी या महिलेचं नाव घेतलं होतं आणि व्होटर आयडी कार्ड दाखवून या ठिकाणी दोन टिक मार्क आहेत असं म्हटलं होतं. हे टिक मार्क पोलिंग बूथ ऑफिसरचे आहेत.शकुन राणी यांनी स्वतःच ही बाब सांगितली आहे की त्यांनी एकदाच मतदान केलं आहे दोनदा नाही. तुम्ही जो आरोप केला आहे त्याला काहीही अर्थ नाही.राहुल गांधींनी पत्रकार परिषदेत जे सादरीकरण केलं त्यात जी माहिती आणि कागदपत्रं सादर केली त्याची चौकशी केली असता हे कळतं आहे की जो टिकमार्क दाखवण्यात आला आहे तो मतदान अधिकाऱ्याने केलेला नाही. शकुन राणी या महिलेने दोनवेळा मतदान केलं हा जो तुमचा आरोप आहे त्याचे सबळ पुरावे द्या. आम्ही निवडणूक कार्यालयाकडून याची चौकशी करतो.शकुन राणी यांच्या प्रमाणेच मतदार यादीत बदल केला गेला आणि नावं हटवली गेली असा आरोप राहुल गांधींनी केला होता. आता आमची त्यांना विनंती आहे की त्यांनी इलेक्ट्रोल रजिस्ट्रेशन रुल्स १९६० च्या अन्वये शपथपत्रावर हस्ताक्षरासह जी नावं मतदार यादीत तुमच्या म्हणण्यानुसार नाहीत ती द्यावीत जेणकरून निवडणूक आयोग आपली कारवाई सुरु करु शकेल.कर्नाटक राज्य निवडणूक आयोगाने असंही म्हटलं आहे की राहुल गांधींनी या सर्व प्रकरणांत उत्तर द्यावं. त्यासाठी त्यांना आम्ही नोटीस बजावत आहोत. दरम्यान ७ ऑगस्टला झालेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी हा आरोप केला होता की महादेवपुरा मतदारसंघात १ लाख २५० मतं चोरण्यात आली. त्यातले ११ हजार ९६५ डुप्लिकेट मतदार होते. तर ४० हजार ९ मतदार यांची कागदपत्रं अपूर्ण होती. या सगळ्यांनी फॉर्म ६ चा दुरुपयोग केला होता. आता याच प्रकरणात निवडणूक आयोगाने आरोपांचे सबळ पुरावे द्यावेत म्हणत राहुल त्यावरुन आता निवडणूक आयोगाने राहुल गांधींना नोटीस बजावली आहे. एवढंच नाही तर राहुल गांधींचे दावे दिशाभूल करणारे आहेत असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

### ३३ हजार ६९२ नावांचा दुरुपयोग

"नव्या मतदारांनी, तरुण मतदारांनी भाजपाला मतदान केलं असं सांगण्यात आलं. त्यासाठी फॉर्म ६ चा उपयोग करण्यात आला. पण ३३ हजार ६९२ नावांचा दुरुपयोग करण्यात आला. तुम्हाला एक उदाहरण देतो. शकुन राणी नावाची एक महिला आहे ही महिला ७० वर्षांची आहे. तिने दोन वेळा अर्ज क्रमांक ६ भरला. आता हे बघा शकुन राणी असं नाव आहे.

# रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्या

## ईडीच्या आरोपपत्रात 58 कोटींची बेकायदेशीर कमाई केल्याचा ठपका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रियांका गांधींचे पती आणि व्यावसायिक रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्याचं दिसून येतं आहे. कारण ईडीच्या चार्जशीटमध्ये रॉबर्ट वाड्रांवर गंभीर आरोप करण्यात आला आहे. रॉबर्ट वाड्रांनी ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केली असा ठपका ईडीच्या आरोपपत्रात ठेवण्यात आला आहे. बेकायदेशीर मार्गाने केलेली कमाई ही आर्थिक अफरातफर मानली जाते.**



त्यामुळे अशा प्रकारे संपत्ती जमा करणं हा कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळेच रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्या आहेत.व्यावसायिक आणि प्रियांका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी ५८ कोटी रुपये बेकायदेशीर मार्गाने कमवले असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. ५८ कोटींपैकी पाच कोटी रुपये ब्लू ब्रीज ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या मार्गाने आणि ५३ कोटी रुपये स्काय लाइट हॉस्पिटालिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून वाड्रांच्या व्यवसाय क्षेत्रात पोहचले. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून ही रक्कम कायदेशीर करण्याचा प्रयत्न झाला. मात्र या कंपन्यांच्या नावे आधीच काही गुन्हे आहेत. त्यामुळे हे प्रकरण समोर आलं. आता रॉबर्ट वाड्रांच्या अडचणींमध्ये भर पडली आहे.ईडीने म्हटलं आहे की रॉबर्ट वाड्रा यांनी स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी आणि BBTPL या कंपन्यांच्या मार्फत आर्थिक अफरातफर करुन ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केली. ही रक्कम त्यांनी त्यांच्या आलीशान रहाणीमानासाठी खर्च केली. आता या प्रकरणात ईडीकडून सखोल तपास सुरु आहे. आली याचा तपास ईडीकडून केला जातो आहे. या दोन कंपन्यांच्या मार्फत रॉबर्ट वाड्रा यांनी स्थावर आणि जंगम अशा दोन्ही मालमत्ता खरेदी केल्याचाही आरोप ईडीने आरोपपत्रात केला आहे.

### ईडीने आणखी काय म्हटलं?

त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी देखील काहीच सांगितलं नाही. मग अडचण काय आहे? अशा गोष्टी आपण दुसऱ्या देशांबद्दल ऐकतो, भारत तर एक लोकशाही देश आहे ना? मग याची माहिती लोकांनी मिळाली पाहिजे," असे सिब्बल म्हणाले.सिब्बल पुढे बोलताना म्हणाले की, "माझे त्यांच्याशी वैयक्तिक इतके चांगले संबंध होते, वकील म्हणून देखील एकत्र काम केलं.

# महिन्यातून किती गोड खाते वल्लरी ?



'नवरी मिळे हिटलरला'या मालिकेतून अभिनेत्री वल्लरी विरा घराघरांत पोहोचली आहे. या मालिकेतून अभिनेत्रीला मोठी प्रसिद्धी मिळाली. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणारी ही मालिका मोठी लोकप्रिय ठरलेली दिसते. आता या मालिकेत वल्लरी विराजने लीला ही भूमिका साकारत सर्वांची मने जिंकली आहेत. अभिनयाबरोबरच सोशल मीडियावरील अभिनेत्रीच्या फोटो, व्हिडीओंना प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसते. आता एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिचा फिटनेस मंत्रा काय आहे, ती गोड खाते का आणि किती व कधी खाते, यावर तिने वक्तव्य केले आहे. वल्लरी विराजने काही दिवसांपूर्वी 'टेली गप्पा' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिचा फिटनेस मंत्रा विचारला, त्यावर तिने म्हटले, "एक काळ होता, कॉलेजमध्ये जेव्हा मी सतत वजनाच्या काट्यावर उभी राहायचे. तेव्हा मला असं वाटायचं की बापरे इतकं वजन वाढलंय वैगेरे. त्यानंतर लॉकडाऊनपासून माझ्या लक्षात आलं की वजन काट्यावर दिसतंय हे महत्वाचं नाही. तुम्ही किती ॲक्टीव्ह आहात, तुम्ही दिवसभरात काय करताय? तुम्हाला कसं वाटतंय, तुम्हाला छान वाटतंय का? तुम्हाला हवे तसे कपडे घालून तुम्हाला ड्रेसअप होता येतंय का, हे महत्वाचं आहे. त्यामुळे वजनाच्या काटावर उभं राहणं मी अगदीच बंद केलं. मी बरोबर गोष्टी खातेय का, यावर मी लक्ष देते. वजनामागे धावू नका, तुम्ही चांगल्या गोष्टी खा, व्यायाम करा, हालचाल करा, आरोग्यदायी जीवनपद्धतीकडे जास्त लक्ष दिलं पाहिजे."



## अशा लोकांना हाकलून दिले पाहिजे

काही दिवसांपूर्वी यूट्यूबवरील 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमुळे मोठा वाद निर्माण झाला होता आणि हा वाद अजूनही सुरूच आहे. प्रसिद्ध यूट्यूबर समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमध्ये रणवीर अलाहाबादियाने पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्यामुळे हा वाद पेटला होता. रणवीरने पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्यामुळे त्याच्यावर सामान्य जनतेसह अनेक कलाकार मंडळींनीदेखील टीका केली होती. रणवीर अलाहाबादियाच्याया वक्तव्यानंतर त्याच्यावर सोशल मीडियासह सर्वच माध्यमांमधून टीकेची झोड उठली. अशातच आता सुप्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते शेखर सुमन यांनीही रणवीरला खडेबोल सुनावले आहेत. शेखर सुमन यांनी, "हे विकृतीचे स्वातंत्र्य आहे. फक्त सॉरी म्हणून चालणार नाही", असे म्हणत रणवीरला चांगलेच फटकारले आहे. तसेच सरकारलादेखील अशा शोवर बंदी घालण्याची आणि अशा लोकांना देशाबाहेर काढण्याची मागणी केली आहे. एका कार्यक्रमात 'इन्स्टंट बॉलीवूड'शी बोलताना शेखर सुमन यांनी 'इंडियाज गॉट लेटेंट'च्या वादावर प्रतिक्रिया दिली आणि रणवीर अलाहाबादियावर जोरदार टीका केली. तसेच पालकांबद्दल केलेल्या अश्लील वक्तव्य ऐकल्यानंतर शेखर सुमन यांनी 'किळस' आल्याचेही म्हटले. याबद्दल शेखर सुमन यांनी स्पष्ट केले, "पालकांबद्दल अश्लील टिप्पणी करणाऱ्या अशा लोकांना देशाबाहेर हाकलून लावले पाहिजे. त्यांनी या देशात राहू नये." शेखर सुमन पुढे म्हणाले, "लोक रोस्टच्या नावाखाली यूट्यूबवर अश्लील गोष्टी करत आहेत आणि त्याला ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य, असं म्हणत आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ असा नाही की, तुम्ही शिव्या द्याल किंवा अशा घाणेरड्या गोष्टी कराल की, ते ऐकून एखाद्या व्यक्तीला मनस्ताप होईल. अशा लोकांना या देशाबाहेर हाकलून दिले पाहिजे."

## शिवाविषयी गैरसमज

कोणत्याही मालिकेत येणारे ट्विस्ट हे प्रेक्षकांची उत्सुकता वाढवतात. मालिकेत पुढे काय होणार, याविषयी प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता असते.याबरोबरच काही प्रश्नही पडलेले असतात. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणाऱ्या 'शिवा'(SHIVA) मालिकेत सतत रंजक वळणे येताना दिसतात. नुकतीच शिवा व आशू पुन्हा एकदा त्यांच्या घरी आल्याचे पाहायला मिळाले. ते येताक्षणी किर्तीने आशू व शिवाबद्दल वाईट बोलले. ते असह्य होऊन सिताईने तिच्या कानाखाली मारल्याचे पाहायला मिळाले होते. आता पुन्हा एकदा किर्ती शिवाविरूद्ध कारस्थान करणार असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमध्ये पाहायला मिळत आहे. झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर शिवा मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की आशूच्या काकांची मुलगी म्हणजेच संपदा व रॉकी एकत्र आहेत. ते एकमेकांवर प्रेम करतात. त्यांना किर्ती एकत्र पाहते. ती त्या दोघांचा फोटो काढते. तेव्हा ती मनातल्या मनात म्हणते, "शिवाबद्दल गैरसमज निर्माण करायला इतक्या लवकर उपाय मिळेल, असं वाटलं नव्हतं मला", त्यानंतर तो फोटो तिच्या काकांना दाखवते. त्यावेळी ती म्हणते, "मी काहीतरी बोलायला जाणार आणि तुम्हाला ते पटणार नाही.



## श्रेयस काय म्हणाला ?

झी चित्र गौरव पुरस्कार' सोहळ्याची सध्या मोठी चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. २५ व्या वर्षानिमित्त मोठा जल्लोष पाहायला मिळत आहे. अनेक मोठ्या कलाकारांची या सोहळ्याला उपस्थिती असल्याचे पाहायला मिळत आहे. अशोक सराफ, निवेदिता सराफ, सिद्धार्थ जाधव, महेश कोठारे, रितेश देशमुख, सचिन पिळगांवकर, सुप्रिया पिळगांवकर, प्राजक्ता माळी, मृण्मयी देशपांडे, श्रेयस तळपदे, भरत जाधव, पुष्कर श्रोत्री, श्रेया बुगडे अशा अनेक कलाकारांची उपस्थिती पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर अनेक रील्स, व्हिडीओमधून या कार्यक्रमात काय धमाल होणार हे पाहायला मिळत आहे. डान्स, पुरस्कार, कॉमेडी यांची धमाल रंगणार असल्याचे दिसत आहे. यंदाच्या 'झी चित्र गौरव' पुरस्कार सोहळ्याच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी रितेश देशमुख व अमेय वाघ यांनी सांभाळल्याचे दिसत आहे. आता या सगळ्यात श्रेयस तळपदेने त्याला पहिला पुरस्कार कधी मिळाला होता, याची आठवण सांगितली आहे.श्रेयस तळपदे त्याच्या पत्नीसह झी चित्र गौरव २०२५ साठी उपस्थित राहिला. त्यावेळी त्याने 'टेलिगप्पा' या यूट्यूब चॅनेलशी संवाद साधला.

## 'झी मराठी'च्या 'लक्ष्मी निवास'मध्ये एन्ट्री घेणार प्रसिद्ध अभिनेत्री अमृता देशमुख!

'झी मराठी' वाहिनीवर गेल्यावर्षीच्या अखेरीस म्हणजेच २३ डिसेंबरला 'लक्ष्मी निवास' ही नवीन मालिका सुरू झाली. या मालिकेची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. याचं मुख्य कारण म्हणजे, 'लक्ष्मी निवास'मध्ये एकापेक्षा एक दमदार कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. हर्षदा खानविलकर, तुषार दळवी, अक्षया देवधर, कुणाल शुक्ला, दिव्या पुगावकर या कलाकारांनी मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. अशातच आता मालिकेत आणखी एका अभिनेत्रीची एन्ट्री होणार आहे. 'लक्ष्मी निवास' मालिकेचं कथानक मध्यमवर्गीय जोडप्यावर आधारलेलं आहे. आपलं हक्काचं घर असावं, आपल्या मुलींची थाटामाटात व चांगल्या घरात लग्न व्हावीत अशी लक्ष्मी आणि श्रीनिवास या दाम्पत्याची इच्छा असते. आता या दोघंही आपल्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने प्रवास करत आहेत. आता या दरम्यान मालिकेत मराठी कलाविश्वातील एक लोकप्रिय अभिनेत्री एन्ट्री घेणार आहे.'लक्ष्मी निवास'मध्ये एन्ट्री घेणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्रीचं नाव आहे अमृता देशमुख. सिंचनाची भूमिका साकारणाऱ्या तन्वी कोलतेने



अमृताच्या एन्ट्रीबाबत पहिली पोस्ट शेअर करत प्रेक्षकांना हिंट दिली होती. तन्वीने सेटवरचा व्हिडीओ शेअर करत अमृता देशमुखचं स्वागत करण्यास अनन्याला ( मालिकेतील छोटी आनंदी ) सांगितलं होतं. या व्हिडीओमधून अमृता या मालिकेत सई ही भूमिका साकारणार असल्याचं स्पष्ट होत आहे. याशिवाय आता स्वत: अमृताने सुद्धा तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर फॅन पोस्ट शेअर करत 'लक्ष्मी निवास'मध्ये एन्ट्री घेणार असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. नाटक, मालिका, चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये अमृता देशमुखने आपल्या दमदार अभिनयाने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वात अमृताने जबरदस्त खेळीने प्रेक्षकांची मनं जिंकली. अमृता अभिनयाबरोबर उत्कृष्ट आरजे आहे. 'पुण्याची टॉकरवडी' म्हणून तिला ओळखलं जातं. काही दिवसांपूर्वी अमृताने प्रेक्षकांना खळखळून हसवण्यासाठी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या नव्या पर्वात एन्ट्री घेतली होती. आता हास्यजत्रेनंतर अमृता मालिकाविश्वात 'लक्ष्मी निवास'च्या माध्यमातून पुनरागमन करणार आहे.आता अमृताची 'लक्ष्मी निवास' मालिकेत केव्हा एन्ट्री होणार आणि ती साकारत असलेल्या सईचं पात्र नेमकं काय असेल याचा उलगडा प्रोमो आल्यावर होईल. दरम्यान, 'लक्ष्मी निवास' ही मालिका रोज रात्री ८ ते

कोट्यवधींची कार

## ३०१५ नंबर प्लेटवरील क्रमांकात दडलंय मोठं गुपित

# रोहितने खरेदी केली कोट्यवधींची कार!

### कारच्या किमती सरूवात ४.५७ कोटींपासून




### केशरी रंगाची नवी कार खरेदी केली

रोहित शर्माने नुकतीच नवीन लॅम्बोर्गिनी ऊरूस कार खरेदी केल्याची चर्चा रंगली आहे. रोहितच्या या नव्या कारचे फोटो, व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. जी त्याने एका कॉंटेन्स्टमध्ये चाहत्याला भेट दिली. त्यानंतर आता हिटमॅनने केशरी रंगाची नवी कार खरेदी केली आहे.रोहित शर्माने खरेदी केलेल्या या लॅम्बोर्गिनी कारच्या किमतीची सरूवात ४.५७ कोटींपासून आहे.

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मा क्रिकेटच्या मैदानापासून हल्ली लांब असला तरी चर्चेत मात्र असतो. रोहित शर्मा नुकताच मोठ्या युरोप सहलीवरून कुटुंबासह मायदेशी परतला आहे. तत्पूर्वी रोहित भारताचा इंग्लंडविरूद्ध अखेरचा कसोटी सामना पाहण्यासाठी ओव्हलच्या मैदानावर पोहोचला होता. यानंतर आता रोहित शर्मा त्याच्या नव्या कारमुळे चर्चेत आहे..**

रोहित शर्मा नुकतीच नवीन लॅम्बोर्गिनी ऊरूस कार खरेदी केल्याची चर्चा रंगली आहे. रोहितच्या या नव्या कारचे फोटो, व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित शर्माकडे यापूर्वीही निळ्या रंगाची लॅम्बोर्गिनी होती, जी त्याने एका कॉंटेन्स्टमध्ये चाहत्याला भेट दिली. त्यानंतर आता हिटमॅनने केशरी रंगाची नवी कार खरेदी केली आहे. रोहित शर्माने खरेदी केलेल्या या लॅम्बोर्गिनी कारच्या किमतीची सरूवात ४.५७ कोटींपासून आहे. तर मुंबईत या कारची किंमत ५ कोटींहून अधिक आहे. या कारनंतर आता कारच्या नंबर प्लेटने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. रोहितच्या आधीच्या कारचा नंबर हा त्याची वनडेमधील सर्वात मोठी खेळी जी २६४ धावांची होती, त्याचा नंबर होता. आता त्याच्या नंबरप्लेटवरील नंबर हा ३०१५ आहे.रोहित शर्माच्या नव्या केशरी कारचा नंबर ०३०१५ आहे. या नंबरमागील खास कनेक्शन म्हणजे हा नंबर रोहितची मुलगी समायरा आणि मुलगा अहान यांच्या वाढदिवसाच्या तारखा आहेत. रोहितची मुलगी समायरा हिचा जन्म ३० डिसेंबरला झाला तर मुलगा अहानचा जन्म १५ नोव्हेंबरला झाला आहे.रोहितच्या या नवीन कारचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये कार मुंबईतील एका डीलरशिपच्या बाहेर दिसते. रोहित डिलिव्हरी घेत असल्याचा अधिकृत फोटो अद्याप समोर आलेला नाही. मात्र चाहत्यांचा उत्साह हे फोटो, व्हीडिओ पाहून शिगेला पोहोचला आहे.रोहित शर्माच्या ताफ्यात अनेक कार आहेत. त्याच्या सध्याच्या कार कलेक्शनमध्ये मर्सिडीज-बेंझ एस-क्लास (सुमारे १.५० कोटी रुपये), मर्सिडीज जीएलएस ४०० डी, बीएमडब्ल्यू एम५ (सुमारे १.७९ कोटी रुपये) आणि रेंज रोव्हर एचएसई एलडब्ल्यूबी (सुमारे २.८० कोटी रुपये) यासारख्या लक्झरी गाड्यांचा समावेश आहे. आता या नवीन लॅम्बोर्गिनीची त्याच्या कलेक्शनमध्ये भर पडली आहे.वीन लॅम्बोर्गिनी ऊरूस कार खरेदी केल्याची चर्चा रंगली आहे. रोहितच्या या नव्या कारचे फोटो, व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित शर्माकडे यापूर्वीही निळ्या रंगाची लॅम्बोर्गिनी होती, जी त्याने एका कॉंटेन्स्टमध्ये चाहत्याला भेट दिली. त्यानंतर आता हिटमॅनने केशरी रंगाची नवी कार खरेदी केली आहे. रोहित शर्माने खरेदी केलेल्या या लॅम्बोर्गिनी कारच्या किमतीची सरूवात ४.५७ कोटींपासून आहे. तर मुंबईत या कारची किंमत ५ कोटींहून अधिक आहे. या कारनंतर आता कारच्या नंबर प्लेटने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. रोहितच्या आधीच्या कारचा नंबर हा त्याची वनडेमधील सर्वात मोठी खेळी जी २६४ धावांची होती, त्याचा नंबर होता. आता त्याच्या नंबरप्लेटवरील नंबर हा ३०१५ आहे.रोहित शर्माच्या नव्या केशरी कारचा नंबर ०३०१५ आहे. या नंबरमागील खास कनेक्शन म्हणजे हा नंबर रोहितची मुलगी समायरा आणि मुलगा अहान यांच्या वाढदिवसाच्या तारखा आहेत. रोहितची मुलगी समायरा हिचा जन्म ३० डिसेंबरला झाला तर मुलगा अहानचा जन्म १५ नोव्हेंबरला झाला आहे. रोहितच्या या नवीन कारचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये कार मुंबईतील एका डीलरशिपच्या बाहेर दिसते. रोहित डिलिव्हरी घेत असल्याचा अधिकृत फोटो अद्याप समोर आलेला नाही. मात्र चाहत्यांचा उत्साह हे फोटो, व्हीडिओ पाहून शिगेला पोहोचला आहे.रोहित शर्माच्या ताफ्यात अनेक कार आहेत. त्याच्या सध्याच्या कार कलेक्शनमध्ये मर्सिडीज-बेंझ एस-क्लास आणि रेंज रोव्हर एचएसई एलडब्ल्यूबी (सुमारे २.८० कोटी रुपये) यासारख्या लक्झरी गाड्यांचा समावेश आहे. आता या नवीन लॅम्बोर्गिनीची त्याच्या कलेक्शनमध्ये भर पडली आहे.

# राजस्थानचा संघ संजूला करणार ट्रेड?

## पण काय आहे आयपीएलचा नियम; वाचा एकाच क्लिकवर




### ट्रेड विंडोचे नियम काय आहेत?

महत्त्वाचं म्हणजे लिलावात खरेदी-विक्री केलेल्या खेळाडूंना ट्रेड करता येत नाही.टू वे ट्रेड – टू वे ट्रेडमध्ये दोन्ही संघ आपआपल्या संघातील खेळाडूंची अदलाबदली करतात. मुंबई इंडियन्सने २०२३ मध्ये वन वे ट्रेड प्रक्रिया वापरत हार्दिक पंड्याला १५ कोटींना गुजरातच्या ताफ्यातून मुंबईच्या संघात सामील केलं होतं. पण यावेळेस मात्र टू वे ट्रेड होण्याची शक्यता आहे.

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संजू सॅमसनचा संघ आगामी आयपीएल २०२६ पूर्वी राजस्थान रॉयल्स संघाची साथ सोडणार असल्याची चर्चा सुरू आहे. स्वत: संजूने राजस्थानकडे त्याला रिलीज करण्याची किंवा ट्रेड करण्याची मागणी केल्याचं समजत आहे. पण राजस्थान रॉयल्सने याबाबत कोणतीही अद्याप अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान संजू सॅमसनला आपल्या संघात घेण्यासाठी अनेक फ्रँचायझी तत्पर आहेत. यामध्ये चेन्नई सुपर किंग्सचं नाव आघाडीव आहे.**

संजू सॅमसन आयपीएल ट्रेड विंडोद्वारे राजस्थानच्या संघातून चेन्नईच्या ताफ्यात सामील होण्याची चर्चा सुरू आहे. पण ही ट्रेड करण्याची प्रक्रिया नेमकी कशी आहे, जाणून घेऊया.आयपीएलमध्ये ट्रेड प्रक्रियेद्वारे आणखी एका मोठ्या खेळाडूची अदलाबदली होण्याची शक्यता आहे. दोन वर्षांपूर्वी मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सकडून हार्दिक पंड्याला ट्रेड विंडोद्वारे आपल्या संघात घेतलं होतं. आता पुढील हंगामासाठी चेन्नई सुपर किंग्सकडून राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनला ट्रेड करण्याची चर्चा रंगली आहे. आयपीएलच्या दोन हंगामांदरम्यान खेळाडूंना एका संघातून दुसऱ्या संघात ट्रेड (अदलाबदल/विक्री) करण्यासाठीचा अधिकृत कालावधी म्हणजे ट्रेड विंडो असते. ट्रेडसाठी खेळाडू आणि दोन्ही संघांची संमती असणं आवश्यक आहे. बीसीसीआय आणि आयपीएल गव्हर्निंग काऊन्सिलची मंजुरीही महत्त्वाची असते. आयपीएल ट्रेड विंडो ही हंगाम संपल्यानंतर आणि दुसरा हंगामाचा लिलाव होण्यापूर्वी एक आठवडा आधीपर्यंत सुरू असते.ही विंडो पुन्हा सुरू होते आणि हंगाम सुरू होण्याच्या ३० दिवस आधी (संध्याकाळी ५:०० वाजता) पर्यंत सुरू असते.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार।
। दि. 11 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने रक्षाबंधन

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये रक्षाबंधन साजरे!

## शिक्षण विश्व : विद्यार्थ्यांनी राख्या बांधून जपले विश्वासाचे नाते

**। पिंपरी चिंचवड ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी : मिलेनियम एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या हातांनी बनवलेल्या राख्या बांधून भावंडांचे अतूट नाते साजरे केले.**



या कार्यक्रमाद्वारे शाळेने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती आणि परंपरेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मुलींनी स्वतः तयार केलेल्या राख्या शाळेतील मुलांना बांधल्या आणि मिठाई भरवून त्यांचे तोंड गोड केले. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण आनंदमय आणि संस्कृतीशील झाले होते.

कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, उपाध्यक्ष निलेश पलघोमल, तसेच सदस्य विलास शेलार, जयवंत बाबर, रमेश पाटील, सुरेश पवार, विनायक पवार, नैना माने आणि नीलम पवार यांनी सहभाग घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाइक व नायगम एगनीस यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अध्यक्ष विजय पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचेही विशेष अभिनंदन केले.



# क्रांती दिन सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन!

## शिक्षण विश्व: संत साई शाळेत शिक्षक व पालकांप्रती कृतज्ञतेची अनोखी भावना




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: भोसरी येथील संत साई हायस्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रांती दिन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षी हा सप्ताह "कृतज्ञता वर्ष" म्हणून साजरा करताना, शाळेने शिक्षक व पालक या विद्यार्थ्यांच्या विकासातील दोन महत्त्वाच्या आधारस्तंभांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यावर भर दिला.**

कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व मशाल प्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी-चिंचवड मुख्याध्यापक संघ अध्यक्ष संभाजी पडवळ, मुख्याध्यापक संघ सचिव सुबोध गलांडे, शिक्षिका आशा बोठे उपस्थित होते.

पाहुण्यांची ओळख शिक्षिका मोहिनी नढे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ५ वी चे विद्यार्थी विराट जयस्वाल व जॉर्डन सिंग यांनी तर आभार प्रदर्शन दक्षा सोमवंशी हिने केले.

या निमित्ताने शाळेत पालक-शिक्षक सन्मान समारंभ, कृतज्ञता या विषयावर आधारित गाणी, कविता, नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केल्यापालक व शिक्षकांच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली

पाहुण्यांनी आपल्या भाषणात पालकांच्या संस्कारांचे व शिक्षकांच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत असे सांगितले की, "घर आणि शाळा हीच खरी कार्यशाळा असून, यामधूनच जबाबदार आणि देशभक्त नागरिक घडतो."या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर, मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर, उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम , शाळेचे ट्रस्टी पायल ढवळेश्वर, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व पालक-शिक्षक संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत साई हायस्कूलच्या या उपक्रमामुळे शिक्षक व पालक यांचे योगदान नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडले गेले. क्रांती दिनाच्या निमित्ताने साजरा झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेमासोबतच कृतज्ञतेचा भाव जागवणारा ठरला.

# संत साई शाळेत क्रांती दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी समाजातील "हेल्पिंग हँड्स" बद्दल व्यक्त केली कृतज्ञता!



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संत साई हायस्कूल, भोसरी येथे गेल्या २४ वर्षांपासून साजरा होणाऱ्या क्रांती सप्ताहाला यंदा 'कृतज्ञता वर्ष' म्हणून विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या निमित्ताने सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी 'समाजातील मदतनीस' या विषयावर आधारित कार्यक्रम पार पडला.**

कार्यक्रमात विविध पथनाट्यांच्या माध्यमातून समाजातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सेवा देणाऱ्या व्यक्तींप्रती विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. डॉक्टर, पोलिस, सफाई कामगार, शिक्षक, शेतकरी, दूधवाला, भाजीवाला, शिंपी, गवंडी अशा अनेक व्यवसायांतील मदतनीसांविषयी आदरभाव व्यक्त करत त्यांच्या योगदानाची जाणीव करून देण्यात आली.

या वेळी लेखक आणि माजी पोलिस अधिकारी ॲड. श्री. रमेश उमरगे, पी.एस.आय. दिनकर गावडे, सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक श्री. भगवान पठारे, तसेच शाळेच्या माजी विद्यार्थीनी डॉ. प्रियंका महाजन, डॉ. सौम्या खोत, डॉ. लावण्या कांबळे, डॉ. निकिता मुथियान आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी आपल्या भाषणात "कृतज्ञता हा शिक्षणाचा पाया आहे," असे सांगून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कृतज्ञ मनाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख पाहुण्यांनीही समाजातील सेवा देणाऱ्या घटकांविषयी कृतज्ञता बाळगण्याचे महत्त्व उदाहरणांसह सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ६वीच्या आरोही सुतकर व देवेंद्र भारट यांनी उत्स्फूर्तपणे केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहशिक्षिका रिया पोतदार व सुप्रिया मोहिते यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर, उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम, ट्रस्टी पायल ढवळेश्वर ,तसेच श् मनोज वाबळे , श्री. प्रमोद शिंदे, संजय अनथें, पालक-शिक्षक संघाचे प्रतिनिधी विठ्ठल पुंडे सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा आगळावेगळा उपक्रम समाजातील प्रत्येक घटकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा ठरला, अशी प्रतिक्रिया पालक आणि पाहुण्यांनी व्यक्त केली.

DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

Jendamark, wipro, NTT DATA, virtusa, B&R, Emcure, KNORR-BREMSE, NuLife, CitiusTech, SHL, McKinley Rice, bvc, Technouniq, RPG, Constrologix, NASSCOM Foundation, INDOVANCE, Tech Mahindra, The DataTech Labs, EMERSON, newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in | admission@dypakurdipune.edu.in | @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."